जा.क्रं/शाअमअ/4589
दि.०८/१२/22

# दिनांक १९/११/२०२२ रोजी एस.सी./एस.टी. सेल च्या आयोजित बैठकीचे इतिवृत्त

दिनांक १९/११/२०२२ रोजी एस.सी./एस.टी. सेल ची बैठक दुपारी १२.१५ वाजता प्राचार्य कक्षेत आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते.

१. प्रा. डॉ. ए. एम. महल्ले, प्राचार्य

२. डॉ. डी. व्हि. रोजतकर, सहा. प्राध्यापक, अणूविद्युत तथा अध्यक्ष, एस.सी./एस. टी. सेल

३. डॉ. एन. एन. खोब्रागडे, सहा. प्राध्यापक, धातूशास्त्र तथा सेल सदस्य

४. प्रा. डी. आर. उईके, सहा. प्राध्यापक, माहिती तंत्रज्ञान तथा सेल सदस्य

५. प्रा. ए. डी. वानखडे, सहा. प्राध्यापक, माहिती तंत्रज्ञान तथा निमंत्रीत सदस्य

६. श्री. ए. जे. कन्हाके, प्रशासकीय अधिकारी तथा सेल सदस्य

७. डॉ. पी. बी. अंभोरे, सहा. प्राध्यापक, माहिती तंत्रज्ञान तथा सेल सदस्य सचिव

बैठकीत खालील मुद्दयांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. त्या अनुषंगाने खालील ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आले आहेत.

ठराव कमांक १:

संस्थेच्या नियामक मंडळामध्ये दोन अध्यापक नामनिर्देशित केले जातात. त्यापैकी एक अध्यापक एस.सी./एस.टी. संवर्गातून असावा. तसेच नियामक मंडळाच्या संरचनेत एक सदस्य या महाविद्यालयातील असावा या मागणीचा प्रस्ताव प्राचार्यांद्वारे मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांना यथाशिघ्र सादर करण्यात येईल असे ठरले.

ठराव कमांक २:

संस्थेतील एस.सी./एस.टी. संवर्गातील विद्यार्थ्यांचा प्रवेश घेतल्या पासुनचा शैक्षणिक प्रगतीचा आढावा/अहवाल खालील मुद्दयांद्वारे संस्थेतील संबंधित विभाग तयार करुन प्राचार्यांना प्रत्येक सत्रास सादर करतील, जेणेकरुन **JBVC** च्या दिनांक ०७/०४/२०१८ च्या सभेत प्राप्त निर्देशा नुसार सदर विद्यार्थ्यांशी संबंधित अडचणी व त्यावरील उपाय यासंबंधि संस्थास्तरावर कार्यवाही करणे शक्य होईल. विद्यार्थ्यांशी संबंधित मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

१. शैक्षणिक वर्गात उपस्थिती

२. विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण/टक्केवारी

३. **Co – Curricular activity** मध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती व सहभाग

४. **Co – Curricular activity** मध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती व सहभाग

५. **Extra – Curricular activity** मध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती व सहभाग

ठराव क्रमांक ३:

एस.सी./एस.टी. संवर्गाचे विद्यार्थी काही वेळेस त्यांचे आर्थिक व वैयक्तिक अडचणींमुळे शैक्षणिक सत्रात संबंधित अभ्यासक्रम पूर्ण न करता शिक्षण अर्धवट सोडून जातात. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे व संस्थेचे सुध्दा नुकसान होते. सदर बाबी संबंधि गांभीयनि दखल घेवून त्या बाबत योग्य त्या कारणमिमांसा सह उपाययोजना करण्याचे ठरले. तसेच एस.सी./एस. टी. विद्यार्थ्यांची प्रगती साधण्याच्या, उच्चतम स्तरावर पोहचण्यासाठी आवश्यक ते सर्व मार्गदर्शन व्हावे यासाठी शैक्षणिक वर्षात **Workshop/Seminar/Symposium/Guidence** चे कार्यक्रम घेण्याचे ठरले.

ठराव क्रमांक ४:

प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर दहा दिवसांच्या आंत एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती सॉप्ट व हार्ड कॉपीत सेलच्या अध्यक्षांना सादर करावी असे ठरले.

ठराव क्रमांक ५:

संस्थेतील एस.सी/एस.टी. विद्यार्थ्यांना सेल ची माहिती उपलब्ध व्हावी यासाठी संस्थेच्या संकेतस्थळावर एस.सी./एस.टी. सेलचा स्वतंत्र टॅब तयार करण्यात यावा व त्या अंतर्गत वेळोवेळी माहिती अद्यावत करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक ६:

**JBVC** च्या दिनांक ०७/०४/२०१८ च्या मिटींगचे इतिवृत्तातील मुद्दा क्र. **A (iii)** अन्वये प्राप्त निर्देशा नुसार एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांच्या विशेष गरजांचा आढावा घेवून त्याबाबत पूर्तता करणे बाबत शासनास कळविण्यात यावे असे कळविण्यत आले आहे. त्या अनुषंगाने

संस्थास्तरावर कार्यपध्दती विकसित करुन कार्यान्वीत करण्याचे ठरले. सदर कार्यवाही करीता आवश्यक असणारी संसाधने संस्थेदवारे पूरविण्यात येतील याबाबत प्राचार्यानी सहमती दर्शविली.

ठराव क्रमांक ७:

मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य व भाषा कौशल्य विकसित करण्यासाठी संस्थेतील लॅग्वेज लेबॉरेटरी चा उपयोग केला जावू शकतो असे प्राचार्यांनी प्रतिपादन केले. तसेच सदर लॅब साठी पूर्ण वेळ निदेशक आमंत्रित करण्यासाठी वित्तीय तरतूद करुन, सदर लॅब आवश्यकते नुसार सकाळी व संध्याकाळी उपयोगात आनली जावू शकते असे सुध्दा प्रतिपादन केले.

ठराव क्रमांक ८:

महाविद्यालयातील एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांच्या अडचणींना वाचा फोडता यावी या करीता सेल मध्ये विद्यार्थी प्रतिनिधी (एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी) यांचा समावेश करता येईल असे ठरले.

ठराव क्रमांक ९:

महाविद्यालयातील अनुत्तीर्ण होणार्या एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांचे **Result Analysis** करुन **Remedial Classes/Coaching/Suitable Action** घेवून सदर विद्यार्थ्यांचे अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी होवून त्यांना मुख्य प्रवाहात आनण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही महाविद्यालय व विभागीय स्तरावर करण्यात येईल या बाबत प्राचार्यांनी आश्वासीत केले.

ठराव क्रमांक १०:

महाविद्यालयातील प्रथम वर्षाचा प्रवेश झाल्यानंतर लगेचच एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यां करीता **Sensitizing Workshop** घेवून त्या मध्ये विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी व त्यांना संस्थेतील विविध योजना/उपक्रम/सुविधा उदा. शिष्यवृत्ती, **Book Bank**, स्पर्धा परीक्षांची माहिती देण्यात येईल जेणेकरुन त्यांचा आत्मविश्वास वृध्दिंगत होण्यास मदत होवून ते सदर अभ्यासक्रमा साठी तयार होतील.

बैठकीचे शेवटी एस.सी/एस.टी. सेलचे सदस्य डॉ. पी. बी. अंभोरे यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले व बैठक संपन्न झाली.

08/12/22

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महा., अमरावती

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
अमरावती

प्रत: १. एस.सी./एस.टी. सेलचे अध्यक्ष/सदस्य मार्फत वि. प्र.

२. सर्व विभाग प्रमुख

३. सर्व अधिष्ठाता

४. प्रशासकीय अधिकारी

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
सत्यमेव जयते
अमरावती